# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:- gondwanaesst@gmail.com

जा.क्र. गो.वि./आस्था./३७०३/२०१९ दि.१५/१०/२०१९

## परिपत्रक

विषय:- विधानसभा सार्वत्रिक निवडणूक -२०१९
मतदारांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी सुट्टी अथवा दोन तासाची सवलत देण्याबाबत.

संदर्भ :- १) मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, गडचिरोली यांचे कार्यालय पत्र क्र./कार्या-१०/अका-१/निवड/कावि-१५७४/२०१९ दिनांक ०३ ऑक्टोंबर, २०१९.
२) उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक मतदान २०१९/प्र.क्र. ७३/कामगार-९ दिनांक २५ सप्टेंबर, २०१९

विद्यापीठातील संविधानिक अधिकारी/अधिकारी/शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयीन प्राचार्य/प्राध्यापक व सर्वसंबंधितांना सुचित करण्यात येते की, विधानसभा सार्वत्रिक निवडणूक -२०१९ चे मतदान सोमवार दिनांक २१ ऑक्टोंबर, २०१९ रोजी होणार आहे. यासंदर्भात मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, गडचिरोली यांनी उक्त संदर्भिय पत्र क्र १ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे संदर्भिय परिपत्रकामधील तरतूदीनुसार कार्यवाही घेण्याचे कळविले आहे.

त्याअनुषंगाने विद्यापीठातील सर्व संविधानिक अधिकारी/अधिकारी/शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना दिनांक २१ ऑक्टोंबर, २०१९ रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या मतदानाच्या दिवशी सुट्टी जाहीर करण्यात येत आहे. करीता सर्वसंबंधितांनी नोंद घ्यावी.

(डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी :-**

१. मा. कुलगुरू, यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरू यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
४. मा. विभाग प्रमुख, पी.जी.टी.डी. गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
५. मा. सर्व विभाग प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
सदरहू परिपत्रक विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना निदर्शनास आणुन द्यावे.